**।। ॐ श्री साईराम ।।**

**‘साई पर्ल्स ऑफ व्हिजडम’**

**साई ज्ञानमौक्तिके**

भगवान साईबाबांच्या चरणकमलांना वंदन

भाग १८ अ

ॐ ॐ ॐ

आज आपण फेब्रुवारी २००१ मध्ये तेलगु सनातन सारथीमध्ये प्रसिद्ध झालेल्या मजकुराविषयी माहिती घेणार आहोत.

## ‘‘हजारोंना दिलेल्या मुलाखती’’

आपल्याला माहीत आहे की स्वामींच्या दर्शनाने प्रत्येकाच्या मनावर आश्चर्यकारक प्रभाव पडतो. ज्या क्षणी आपण स्वामींना बघतो, त्याच क्षणापासून प्रभावित आणि उत्साहित होऊन, चैतन्यमय होऊन राहतो. खूप दिवसांत त्यांचे प्रत्यक्ष दर्शन न झाल्याने आपल्याला दुराव्याच्या तीव्र वेदना होतात. आपल्याला एकटेपण जाणवू लागतं आणि शरीर गळून गेल्यासारखं वाटतं.

जेव्हा स्वामी दररोज संध्याकाळी व्हरांड्यात बसून विद्यार्थी आणि शिक्षकांशी बोलतात, तेव्हा आपल्याला ‘सार्वजनिक मुलाखती’सारखं वाटतं. ते एकाच वेळी हजारोंना मुलाखत देत असतात. तुम्ही सगळे त्यांना बघू शकता, हजारो लोक त्यांचं बोलणं ऐकतात आणि सर्वांना त्याचा फायदा होतो. हे खरं आहे ना? ती एक प्रकारची सार्वजनिक मुलाखतच असते.

## ‘त्यांची आत्मिक/आंतरिक ओळख’

स्वामींच्या सार्वजनिक भाषणांपेक्षा त्यांच्याशी साधलेल्या वैयक्तिक संभाषणामुळे आपल्याला त्यांची आत्मिक ओळख होण्यास मदत होते. आपण त्यांना आध्यात्मिक दृष्टीने समजावून घेऊ शकतो.

म्हणून आपल्या परमेश्वराला, ज्याची आपण प्रार्थना करतो, त्या परमेश्वराला जाणून घेण्याची अतिशय जरुरी आहे. त्या परमेश्वराला जाणून न घेताच त्याची प्रार्थना करणं हे यंत्रवत आणि साचेबंद होईल. जेव्हा आपण त्याला समजून घेऊन प्रार्थना करू, तेव्हा आपल्याला त्याचे फळ मिळाल्याचा अनुभव येईल. संत त्यागराज यांनी हेच सांगितलं आहे की परमेश्वरावी प्रार्थना करण्यापूर्वी त्याची खरी ओळख झाली पाहिजे.

## ‘चवीचे (जीभेचे) गुलाम – आयुष्य वाया जाणे

त्या दिवशी संध्याकाळी भगवानांनी आरोग्याविषयी बोलण्याचे ठरवले होते. त्यांनी सांगितलं की आपण सडसडीत राहिलं पाहिजे. आपल्याला जडत्व जाणवू नये. जेवणानंतर आपल्याला झटकन उठता आलं पाहिजे. उठताना शरीर ओढत नेल्यासारखं वाटू नये. त्यापुढे ते म्हणाले की काही माणसं शरीराने जाड असतात. त्यांचे पाय बारीक असून शरीर मात्र जड आणि भक्कम असतं. बाबा म्हणाले की असं शरीर म्हणजे कमकुवत खांबावर बांधलेली मोठी इमारत असते. अशी इमारत केव्हाही कोसळू शकते. असे दुर्बळ पाय शरीराचे वजन पेलू शकणार नाहीत आणि काही वेळेला सांधेदुखी किंवा अस्थिरोग होऊ शकतात. म्हणून सर्वांनी स्वत:चे शरीर जड व स्थूल न होण्याची काळजी घेतली पाहिजे.

स्वामी म्हणाले, ‘‘जर आपण आपल्या जीभेचे गुलाम झालो तर आयुष्य वाया जाईल.’’

मग भगवानांनी आपल्या भूतकाळाविषयी बोलायला सुरूवात केली. २५-३० वर्षांपूर्वी भगवान आंध्र प्रदेशातील पूर्व गोदावरी जिल्ह्याला वरचेवर भेट देत असत. खरं म्हणजे त्यांनी त्या जिल्ह्यातील प्रत्येक भागाला भेट दिली आहे.

स्वामी म्हणाले, ''तुम्हाला माहीत आहे का की त्या दिवसांमध्ये, त्या काळी मी सगळीकडे गाडीने प्रवास करत असे. खूपशा गावांमधून लांब पल्ल्याच्या गावांमधून गाडीने फिरत असे. आणि तुमचा विश्वास बसणार नाही की मी त्या प्रवासात काहीही खात नसे. काहीही खात नसे आणि पीतही नसे.''

एके काळी त्यांचा ड्रायव्हर असलेल्या रहिमबद्दल ते म्हणाले की ते रहिमला खाण्यासाठी फळे देत असत आणि त्याला झोप येऊ नये म्हणून गाणीही म्हणत, गोष्टीही सांगत असत. स्वामी म्हणाले, ''मी त्याच्याबरोबर विनोदही करत असे. त्याला म्हणत असे, ''अरे रहिम, तू पुढच्या सीटवर बसतोस आणि मी मागच्या सीटवर बसतो. गाडी जसजशी वेग घेऊ लागते, तसतसे मला हिचके बसू लागतात, तुला नाही.''

**विश्वामित्र, राम आणि लक्ष्मणाला संरक्षणासाठी विनंती**

मग भगवानांनी रामायणाविषयी सांगायला सुरूवात केली. या कथेतले राम आणि लक्ष्मण हे दोघे भाऊ तुम्हाला माहीतच आहे. विश्वामित्र ऋषी करत असलेल्या यज्ञाचे संरक्षण करण्यासाठी या दोघा भावांना त्यांच्या स्वत:बरोबर येण्यासाठी सांगितले होते. हे जंगल राक्षसांनी व्यापलेलं असून ते राक्षस ऋषीमुनी करत असलेल्या यज्ञ विधींवर नेहमी हल्ले करत असत विश्वामित्रांना रामलक्ष्मणाचे सहाय्य हवे होते. ते स्वत: या राक्षसांना पराभूत करू शकत नव्हते म्हणून नव्हे, तर यज्ञयाग करणाऱ्या व्यक्तींनी कोणालाही मारून टाकू नये म्हणून. हा एक नियमच होता. म्हणून विश्वामित्र या दोन पुत्रांच्या पित्याकडे, त्यांची अनुज्ञा मिळवण्यासाठी गेले. त्यांनी दशरथाला विचारले, ''हे दशरथा, तुझ्या दोन्ही पुत्रांना माझ्याबरोबर पाठव.'' दशरथाला रडू कोसळले. ''मी तुझ्याबरोबर पाठवू शकत नाही. खूप काळ वाट पाहून आणि मोठ्या कष्टाने ह्या मुलांचा जन्म झाला आहे आणि मी त्यांच्यापासून आता दूर राहू शकत नाही.''

विश्वामित्रांनी त्याला उत्तर दिले, ''राजा, मी सांगेन ते तू करशील असं वचन तू मला दिले आहेस. आता तू तुझे वचन मोडू शकत नाहीस.''

दशरथ म्हणाला, ''हे विश्वामित्रा, त्या वचनातून कृपा करून माझ्या मुलांना बाजूला ठेव. ती मुलं लहान आहेत. जणू काही बदकाची छोटी पिल्लेच आहेत. मी त्यांच्यावाचून जगू शकणार नाही. मी स्वत: तुझ्याबरोबर येतो. मी यज्ञाचं रक्षण करीन.''

तेव्हा विश्वामित्र म्हणाले, ''लक्षात घे दशरथा, सत्यासाठी प्राण देणाऱ्या लोकांच्या वंशातला असा तू आहेस आणि आता तू वचनभंग करीत आहेस काय?''

अशा प्रकारे विश्वामित्रांनी आपल्याबरोबर राम आणि लक्ष्मणांनी यावं असा आग्रह धरला.

ते पुढे म्हणाले, ''हे राजा, मला कळत नाही की यांच्यात तुझी कोणत्या प्रकारची जवळीक आहे? तुला वाटतं की राम-लक्ष्मण हे तुझे पुत्र आहेत, पण ते कोण आहेत ते तुला माहीत नाही. खरं म्हणजे राम हा परमेश्वरच आहे. मग तू का चिंता करतोस? ते तुझे पुत्र आहेत असा विचार तू का करतोस?''

अशा प्रकारच्या भाषणाने यज्ञरक्षणासाठी, सुरक्षाधारी म्हणून त्या दोन भावांना स्वत:बरोबर वनात नेण्यास विश्वामित्र यशस्वी झाले.

खूप कष्टमय प्रवासानंतर, सायंकाळ होता होता हे दोन्ही भाऊ विश्वामित्रांच्या जवळ आले, तेव्हा विश्वामित्र म्हणाले, ''हे पहा, राम-लक्ष्मणा, आता रात्र भरभर होत चालली आहे आणि अवतीभवती राक्षसही येऊ लागतील, ते तुम्हाला मारतीलही, तेव्हा आता या ठिकाणापासून त्यांना दूर ठेवण्यासाठी तुम्हाला रात्रभर जागे राहावे लागेल.

''तुम्ही महान राजाचे राजपुत्र आहात, तेव्हा तुम्हाला चवदार, श्रीमंती पदार्थ खाण्याची सवय असेल, ते इथे या जंगलात मिळू शकणार नाहीत. म्हणून माझ्या प्रिय मुलांनो, मी तुम्हाला ज्ञानाचे दोन प्रकार सांगतो. एक आहे बल, आणि दुसरा आहे अतिबल. ह्या दोन प्रकारामुळे तुम्ही निद्राविरहित आणि क्षुधेविरहित राहू शकाल.

कारण तुमची भूकच नाहीशी झाली असेल, तेव्हा चिंता करू नका.''

## 'विश्वामित्रांचा संभ्रम'

नंतर भगवान म्हणाले, ''पहाख विश्वामित्रांनी कसा संभ्रम निर्माण केला? काही काळापूर्वी ते दशरथ राजाला म्हणाले की ही मुले तुझी आहेत असा विचार का करतोस? राम हा प्रत्यक्ष परमेश्वर आहे.'' आणि मग मात्र त्याच विश्वामित्राने मुलांना सांगितले की या जंगलात असे राक्षस आहेत की ते त्यांच्यावर हल्ला करतील. एका बाजूला ते म्हणतात की ती मुले म्हणजे परमेश्वर आहेत आणि आता ते असेही म्हणतील की ते हे विसरूनही गेले होते. त्यांनी त्या मुलांना सामान्य मुलांसारखं बरोबर घेतलं आणि आता ते त्यांना तयार करणार होते.'' म्हणून संभ्रम हा इतका बलिष्ठ आहे की अगदी साधु-संतसुद्धा त्याच्यामुळे वाहवत जातात. कुठल्या कुठे फेकले जातात. तसंच, त्याप्रमाणेच आपल्याला माहीत आहे की बाबा हे परमेश्वर आहेत. होय! आणि काही काळाने तुम्ही विचार करू लागाल की मला काही त्रास होत आहे हे त्यांना समजत असेल का? माझा व्हिसा लवकरच संपणार आहे हे त्यांना कळत असेल का? माहीत असेल का? आपण त्यांच्याविषयी अशा शंका घेऊ लागतो. पण नंतर पुन्हा 'ते देव आहेत', 'ते माझ्या स्वप्नात आले', 'त्यांनी मला हे सांगितलं-ते सांगितलं आणि त्यांनी दाखविल्यासारखीच प्रत्येक गोष्ट घडली.''

अशा प्रकारचे हे आभासाचे-संभ्रमाचे परिणाम असतात.

***